वस्तूनिष्ठ प्रश्नसंच

# भारतीय संविधानातील तरतुदी आणि स्थानिक स्वशासन

**India's Constitutional Provisions and Local Self Government**


- प्रा.डॉ. निलेश निंबाळकर
- प्रा.डॉ. राजेंद्र कोरडे
- प्रा.डॉ. प्रिया बोचे
- प्रा. अशोक कायंदे
- प्रा. गोपाल राखोंडे
- प्रा.डॉ. अलका जाधव

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या नवीन अभ्यासक्रमानुसार बी.ए. भाग १ च्या सेमिस्टर २ करीता व इतर विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता तसेच UPSC, MPSC, NET-SET व इतर स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त.

India's Constitutional Provisions & Local Self-Government

# भारतीय संविधानातील तरतूदी आणि स्थानिक स्वशासन

(वस्तुनिष्ठ प्रश्नसंच)


प्रा.डॉ. निलेश र. निंबाळकर

प्रा.डॉ. राजेंद्र श्री. कोरडे प्रा.डॉ. प्रिया भा. बोचे

प्रा.श्री. अशोक त्र्यं. कायंदे प्रा.श्री. गोपाल श्री. राखोंडे

प्रा.डॉ. अलका के. जाधव



अथर्व पब्लिकेशन्स

**अथर्व पब्लिकेशन्स**

**भारतीय संविधानातील तरतूदी आणि स्थानिक स्वशासन**

(India's Constitutional Provisions & Local Self-Government)

© सुरक्षित

P Book ISBN : 978-81-94543-36-7
E Book ISBN : 978-93-90288-00-7
पुस्तक प्रकाशन क्र. ७२५

**प्रकाशक**
युवराज भटू माळी
**अथर्व पब्लिकेशन्स**
**धुळे :** १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे ४२४००१. **संपर्क:** ९४०५२०६२३०
**जळगाव :** शॉप नं.२, नक्षत्र अपार्टमेंट, शाहू नगर हौसिंग सोसायटी,
तेली समाज मंगल कार्यालय समोर, जळगाव ४२५ ००१.
**संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
**ई-मेल :** atharvapublications@gmail.com
**वेबसाईट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** २८ मे २०२० **अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स
**मूल्य :** ₹ १००/-

**E-Book *available on***
**amazon.in ■ kopykitab.com ■ atharvapublications.com**

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.



**राज्यशास्त्र अध्ययन व संशोधन मंच, बुलडाणा**

**-: मार्गदर्शक :-**

**डॉ. हेमलता भावसार**
प्रभारी प्राचार्या, पुंडलीक महाराज महाविद्यालय, नांदूरा रेल्वे.
**डॉ. श्रीराम येरणकर**
प्राचार्य, जनता कला-वाणिज्य महाविद्यालय, मलकापूर.
सदस्य, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ, सं.गा.बा.अम. विद्यालय, अमरावती.
**डॉ. सुरेश वाठे**
प्राचार्य, कला महाविद्यालय, बुलडाणा.

**-: सल्लागार मंडळ :-**

**प्रा.डॉ. प्रतिभा अ. टावरी**
सहयोगी प्राध्यापिका, गो.से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांव.
**प्रा.डॉ. रमेश इंगोले**
सहाय्यक प्राध्यापक, जनता कला-वाणिज्य महाविद्यालय, मलकापूर.
**प्रा.डॉ. जे. जे. जाधव**
सहयोगी प्राध्यापक, श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली.
**प्रा.डॉ. विनोद को. गायकवाड**
सहाय्यक प्राध्यापक, ग.भि. मुरारका महाविद्यालय, शेगांव.
**प्रा.डॉ. अनंत म. आवटी**
सहयोगी प्राध्यापक, श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगांव राजा.
**प्रा.डॉ. रमेश सुरडकर**
सहाय्यक प्राध्यापक, श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर.
**प्रा.डॉ. दिपक देशमाने**
सहाय्यक प्राध्यापक, नारायणराव नागरे कला महाविद्यालय, दुसरबिड.
**प्रा.डॉ. भगवान गरूडे**
सहाय्यक प्राध्यापक, राजे छत्रपती कला महाविद्यालय, धामणगांव बढे.
**प्रा. विलास टाले**
सहाय्यक प्राध्यापक, कला महाविद्यालय, बुलडाणा.
**प्रा. लक्ष्मण शिराळे**
सहाय्यक प्राध्यापक, विदर्भ महाविद्यालय, बुलडाणा.
**प्रा.डॉ. नागेश खु. गायकवाड**
सहाय्यक प्राध्यापक, शि.प्र.म. तात्यासाहेब महाराज महाविद्यालय, चिखली.

**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY**
**SYLLABI FOR B.A. (Part I)**
**Semester II : Political Science**
**(Implemented from 2017-18)**

## Indian Constitution Provinces & Local Self Government

*Mark : Theory 80* *In Ass 20*

**Unit I**

i. Election Commission of India : Structure, Function and Powers
ii. Election Reform, Recognition of Political Party
iii. Elegiblity of Voter - Lok Sabha, Vidhan Sabha and Vidhan Parishad

**Unit II : State Executive**

i. Governor : Appointment, Power and Role
ii. Chief Minister : Appointment, Role and Function
iii. Council of Minister : Formation, Role and Function

**Unit III : State Legislature of Maharashtra**

i. Legislative Assembly (Vidhan Sabha) Structure, Power and Function Speaker of Vidhan Sabha – Power and Function
ii. Legislative Council (Vidhan Parishad) Structure, Power and Function

**Unit IV : Local Self Government of Maharashtra**

i. Type of Local Self Government (Urban and Rural)
ii. Municipal Corporation : Structure and Power
iii. Gram Panchayat : Structure and Function
iv. Gram Sabha : Structure and Function

**Unit V**

i. Womens Participations in Panchayat Raj of Maharashtra
ii. Nagpur pact for Sanyukt Maharashtra and Its Recommendations
iii. Right to Information and Its Important

**Distribution of Internal Markes**

i. Seminar – 10 Marks
ii. News Papers Cutting Collection – 10 Marks



## -: मनोगत :-

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती राज्यशास्त्र विषयाअंतर्गत 'भारतीय घटनात्मक तरतूदी आणि स्थानिक स्वशासन' या बी.ए. भाग-१ सत्र-२ च्या अभ्यासक्रमावर आधारीत वस्तुनिष्ठ प्रश्नसंच ई-बुक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविताना आम्हाला आनंद होत आहे. विद्यापीठाच्या नियमित अभ्यासक्रमिय विद्यार्थ्यांसोबतच स्पर्धा परीक्षा परीक्षार्थ्यांना सुद्धा भारतीय राज्यघटनेच्या अनुषंगाने हा प्रश्नसंच उपयोगी पडेल असा विश्वास वाटतो.

प्रस्तुत वस्तुनिष्ठ प्रश्नसंच ई-बुक अंतर्गत अभ्यासक्रमातील पाचही घटकांमधील वस्तुनिष्ठ प्रश्नांची सूक्ष्म अध्ययनाच्या आधारावर भारतीय राज्यघटनेतील बाबी विद्यार्थ्यांना समजतील अशा पद्धतीने प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रश्नसंचाच्या अंतर्गत प्रश्नांची उत्तरे प्रत्येक पेजवर तळटीप (Footnote) जागी देण्यात आलेली आहेत.

या वस्तुनिष्ठ प्रश्नसंचाची निर्मिती करण्यामागचा उद्देश स्पष्ट करताना 'कोविड-१९'च्या जागतिक महामारीने भारतासह संपूर्ण जगाला प्रभावित केले आणि या प्रभावाचा इतर सर्व व्यवस्थांबरोबर भारतीय शैक्षणिक व्यवस्थेवर प्रभाव पडून महाविद्यालयीन शिक्षणही प्रभावित झालेले होते. अशा पार्श्वभूमीवर 'वर्क फ्रॉम होम' या मार्गाने शैक्षणिक कार्य सुरू झाले. विद्यार्थ्यांच्या परीक्षा कशा घ्यायच्या या दृष्टीने शासन व शिक्षणतज्ज्ञांच्या स्तरावर विचारविनिमयाला सुरूवात झाली व 'फिजिकल डिस्टन्सींग'चा वापर करून कमीत कमी वेळात परीक्षा घेण्याचा विचार सुरू झाला. अशा स्थितीत वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या द्वारे परीक्षा घेणे हा एक प्रभावी मार्ग ठरू शकतो. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची वस्तुनिष्ठ प्रश्नांची तयारी करून घेण्याच्या उद्देशाने तसेच विद्यार्थी हिताकरीता वेळेचा सदूपयोग या दृष्टिकोनातून जिल्हात २०१४ पासून राज्यशास्त्र प्राध्यापकांच्या संघटनातून कार्यरत 'राज्यशास्त्र अध्ययन व संशोधन मंच' प्राध्यापकांच्या विचारमंथनातून वस्तुनिष्ठ प्रश्नसंचाची संकल्पना मांडल्या गेली आणि वस्तुनिष्ठ प्रश्नसंच ई-बुक काढण्याचे ठरले. शिक्षणक्रमानुसार बी.ए. भाग-१, भाग-२ व भाग-३ सत्रनिहाय प्राध्यापकांची विभागणी करण्यात येवून हे कार्य पार पडले.

'कोविड-१९'मुळे शैक्षणिक प्रक्रियेत आमच्या शिक्षक सहकाऱ्यांचा हा संयुक्त ई-बुक (E-Book) चा प्रयत्न आमच्या महाविद्यालयीन

विद्यार्थीमित्रांना निश्चित मार्गदर्शक, प्रेरणादायी व उपयुक्त ठरेल असा विश्वास आहे.

आमचा हा पहिलाच प्रयत्न असून अत्यंत कमी वेळात ई-बुक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याच्या घाईत यात चुका किंवा उणिवा राहण्याची शक्यता आहे. त्या आपण लक्षात आणून दिल्यास निश्चितच दूर करण्यात येईल असा आम्ही विश्वास देतो.

– लेखक



## -: अनुक्रमणिका :-

घटक क्र. १ ........................................ १
- निवडणूक आयोग व निवडणूक सुधारणा
- राजकीय पक्ष मान्यता
- मतदाराची पात्रता (लोकसभा, विधानसभा, विधानपरिषद)

घटक क्र. २ ........................................ १७
- राज्यपाल पद व्यवस्था
- मुख्यमंत्री पद व्यवस्था
- मंत्रिमंडळ पद व्यवस्था

घटक क्र. ३ ........................................ ३०
- घटकराज्य विधिमंडळ व्यवस्था
- विधानसभा सभागृह
- विधानपरिषद सभागृह

घटक क्र. ४ ........................................ ४१
- महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रकार – शहरी/ग्रामीण
- महानगरपालिका
- ग्रामपंचायत व ग्रामसभा

घटक क्र. ५ ........................................ ५०
- महिलांचा पंचायत राज्यव्यवस्थेतील सहभाग
- नागपूर करार
- माहितीचा अधिकार

## घटक क्र. ६

- निवडणूक आयोग व निवडणूक सुधारणा
- राजकीय पक्ष मान्यता
- [illegible]

१) निवडणूक आयोगाचे कलम?

अ) कलम ३२४ ब) कलम [illegible]

क) कलम [illegible] ड) कलम [illegible]

२) संविधानानुसार कोणत्या वयात निवडणूक आयुक्तांना पद सोडावे लागते?

अ) ६५ वर्ष ब) ६० वर्ष

क) ६२ वर्ष ड) ५८ वर्ष

३) निवडणूक आयोगाची स्थापना केव्हा झाली?

अ) २६ जानेवारी १९५० ब) १५ ऑगस्ट १९४७

क) २५ जानेवारी १९५० ड) यापैकी नाही

४) घटनेत निवडणूक व्यवस्थेशी कलमे?

अ) कलम ३२४ ते ३२९ ब) कलम [illegible] ते [illegible]

क) कलम ३६० ते ३६८ ड) कलम [illegible] ते [illegible]

५) भारतात केंद्रीय निवडणूक आयोग?

अ) द्विसदस्यीय ब) एकसदस्यीय

क) त्रिसदस्यीय ड) यापैकी नाही

६) निवडणूक आयोग त्रिसदस्यीय केव्हा झाला?

अ) १६ ऑक्टोबर १९९० ब) १६ ऑक्टोबर १९८९

क) १५ ऑगस्ट १९६० ड) यापैकी नाही

---

उत्तरसूची : १) अ २) क ३) क ४) अ ५) क ६) ब

७) निवडणूक आयोग १९८९ पर्यंत?
अ) द्वि-सदस्य होता ब) एक सदस्य होता
क) त्रि-सदस्य होता ड) यापैकी नाही

८) निवडणूक आयुक्तांची नेमणूक कोण करते?
अ) पंतप्रधान ब) राज्यपाल
क) राष्ट्रपती ड) मुख्यमंत्री

९) भारतात निवडणूक सुधारनेचे जनक कोणास संबोधले जाते?
अ) एच.डी. देवगौडा ब) चरण सिंग
क) टी. एन. शेषन ड) यापैकी नाही

१०) निवडणूक आयुक्त यांचा कार्यकाळ किती वर्षाचा असतो?
अ) ४ वर्षे ब) ५ वर्षे
क) ६ वर्षे ड) यापैकी नाही

११) वयाच्या कितव्या वर्षापर्यंत निवडणूक आयुक्त हे आयुक्त म्हणून कार्य करू शकतात?
अ) ६५ वर्ष ब) ६४ वर्ष
क) ६२ वर्ष ड) ६० वर्ष

१२) निवडणूक आयुक्तांना कोणत्या पद्धतीने पदमुक्त केल्या जाते?
अ) राष्ट्रपतीद्वारे ब) मंत्रीमंडळद्वारे
क) महाभियोग पद्धत ड) यापैकी नाही

१३) भारतात निवडणुकासंदर्भात केलेलले कायदे किंवा नियमांद्वारे झालेल्या बदलांना काय म्हणतात?
अ) शासनविषयक सुधारणा ब) कायदेविषयक सुधारणा
क) निवडणूक सुधारणा ड) यापैकी नाही

१४) निवडणूक आयोगाचे महत्त्वपूर्ण कार्य कोणते?
अ) निवडणुकांचे संचालन करणे
ब) राज्यकारभार करणे
क) न्यायदान करणे
ड) कायदे करणे

१५) राजकीय पक्षांना चिन्हे व मान्यता कोण देतो?
अ) राष्ट्रपती ब) पंतप्रधान
क) निवडणूक आयोग ड) यापैकी नाही

---

**उत्तरसूची :** ७) ब ८) क ९) क १०) क ११) अ १२) क १३) क १४) अ १५) क

१६) राजकीय पक्ष, शासन कर्ते, नागरिक यांच्यावर निवडणूक काळात जी बंधने असतात त्यास काय म्हणतात?
अ) मूलभूत कर्तव्ये ब) आदर्श आचार संहिता
क) हक्क ड) यापैकी नाही

१७) भारतात आदर्श आचार संहितेचा सर्वप्रथम राजकीय पक्षांनी मान्यता कधी प्रदान केली?
अ) १९४८ ब) १९४०
क) १९३८ ड) १९६८

१८) आदर्श आचार संहितेची प्रभावी अंमलबजावणी केव्हापासून झाली?
अ) १९७८ ब) १९९२
क) १९८९ ड) १९९१

१९) आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीला कोणी सुरुवात केली?
अ) व्ही.कृष्णमूर्ती
ब) रामास्वामी
क) निवडणूक आयुक्त टी.एन. शेषन
ड) यापैकी नाही

२०) मतदारांची वयोमर्यादा २१ वर्षावरून १८ वर्ष कितव्या घटना दुरुस्तीनुसार झाली?
अ) ६५ व्या
ब) ७३ व्या
क) ६१ व्या घटना दुरुस्तीनुसार (१९८९)
ड) ४२ व्या

२१) इलेक्ट्रॉनिक मतदान (EVM) वापर प्रथम कोणत्या राज्यात करण्यात आला.
अ) गोवा ब) महाराष्ट्र
क) कर्नाटक ड) सिक्किम

२२) भारतामध्ये निवडणुकीसंबंधी सर्वप्रथम कोणता कायदा करण्यात आला?
अ) गुन्हेगारी प्रतिबंध कायदा
ब) जनप्रतिनिधित्व कायदा
क) मतदान वयासंबंधी कायदा
ड) यापैकी नाही

---

**उत्तरसूची :** १६) ब १७) ड १८) ड १९) क २०) क २१ अ २२) ब

२३) १९६८ निवडणूक आयोगाव्दारे ठरलेल्या आचार संहितेमध्ये कधी दुरुस्ती करण्यात आली?
अ) २००५ ब) २०००
क) २००२ ड) यापैकी नाही

२४) निर्वाचन आयोग त्रिसदस्य करण्यासाठी कोणी शिफारस केली?
अ) तारकुंडे समिती ब) मुदलीयार समिती
क) पण्णीक्रम समिती ड) यापैकी नाही

२५) निवडणुकीत एक व्यक्ती किती ठिकाणी निवडणूक लावू शकते?
अ) एक ब) दोन
क) तीन ड) चार

२६) निवडणूक आयोगाने एक्झिट पोलवर कोणत्या वर्षी बंदी घातली?
अ) २०१३ ब) २००९
क) २००५ ड) २०२०

२७) निवडणुकीतील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी निवडणूक खर्चावर मर्यादा कधी केल्या गेल्या?
अ) २००९ ब) २०१४
क) २०११ ड) २०१८

२८) सोशल मीडियाचा प्रभाव कमी करण्यासाठी निवडणुक आयागाने नियमावली तयार केली.
अ) २०१३ ब) २०१४
क) २०१६ ड) २०१८

२९) मतदारांना ओळखपत्र देण्याचा कार्यक्रम कोणी केला?
अ) लींगडोह ब) कृष्णमुर्ती
क) टी.एन. शेषन ड) यापैकी नाही

३०) भारतात कोणती शासन व्यवस्था आहे?
अ) साम्यवादी ब) अध्यक्षीय
क) संसदीय शासन व्यवस्था ड) हुकूमशाही

३१) भारतामध्ये पक्ष पद्धतीचा प्रकार कोणता?
अ) द्विपक्ष पद्धती ब) एकपक्ष पद्धती
क) बहुपक्ष पद्धती ड) यापैकी नाही

**उत्तरसूची :** २३) अ २४) अ २५) ब २६) ब २७) क २८) अ २९) क ३०) क ३१) क



३२) भारतीय पक्ष पद्धतीचे वैशिष्ट्य कोणते?
अ) व्यक्तिपूजक पक्ष
ब) विचारसरणीवर आधारीत
क) बहुपक्ष पद्धत
ड) वरील सर्व

३३) भारतात राजकीय पक्षांना निर्धारित अटीनुसार मान्यता देण्याचे किंवा मान्यता रद्द करण्याचे कार्य कोण करते?
अ) लोकसभा ब) राजकीय पक्ष
क) निवडणूक आयोग ड) मंत्रीमंडळ

३४) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना?
अ) १८८५ ब) १९४८
क) १९५० ड) १८८६

३५) भारतीय जनता पक्षाची स्थापना?
अ) १९८० ब) १९८८
क) १९९० ड) यापैकी नाही

३६) राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना?
अ) १९९९ ब) १९८८
क) १९४८ ड) २०००

३७) बहुजन समाजवादी पक्षाची स्थापना?
अ) १९४८ ब) १९९०
क) १९८४ ड) यापैकी नाही

३८) भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पक्षाची स्थापना?
अ) १९६० ब) १९६४
क) १९७५ ड) १९८०

३९) प्रादेशिक पक्ष म्हणून विधानसभा निवडणुकीत किती मते आवश्यक आहेत?
अ) ६% मते ब) ७% मते
क) ४% मते ड) यापैकी नाही

४०) महाराष्ट्रात मान्यताप्राप्त प्रादेशिक पक्ष कोणता?
अ) शिवसेना ब) राष्ट्रवादी
क) काँग्रेस ड) भाजपा

**उत्तरसूची :** ३२) ड ३३) क ३४) अ ३५) अ ३६) अ ३७) क ३८) ब ३९) अ ४०) क

४१) शिवसेनेचे निवडणूक चिन्ह?
अ) हत्ती
ब) रेल्वे इंजन
क) धनुष्यबान
ड) यापैकी नाही

४२) मनसेचे निवडणूक चिन्ह?
अ) रेल्वे इंजन
ब) पंजा
क) झाडू
ड) हत्ती

४३) लोकसभेकरीता मतदाराची वयोमर्यादा?
अ) १८ वर्ष
ब) २१ वर्षे
क) ३२ वर्षे
ड) यापैकी नाही

४४) विधानसभेकरिता मतदाराची वयोमर्यादा?
अ) २५ वर्षे
ब) २१ वर्षे
क) १८ वर्षे
ड) ३५ वर्षे

४५) विधानसभा सदस्याद्वारे विधान परिषद सभागृहात निवडून दिल्या जाणाऱ्या सदस्यास कोण मतदान करतो?
अ) राज्यसभा सदस्य
ब) विधान परीषद सदस्य
क) विधानसभा सदस्य
ड) यापैकी नाही

४६) विधान परिषदेत स्थानिक स्वराज्य संस्थाद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सभासदास मतदान करणारा मतदार –
अ) शिक्षक असावा
ब) स्थानिक स्वराज्य संस्थेचा सभासद असावा
क) पदवीधर असावा
ड) यापैकी नाही

४७) शिक्षक मतदारसंघाकरीता शिक्षक मतदाराने शिक्षक म्हणून किती वर्षे पूर्ण केलेले असावी?
अ) २ वर्षे
ब) ५ वर्षे
क) ३ वर्षे
ड) यापैकी नाही

४८) महाराष्ट्र विधान परिषदेची सभासद संख्या?
अ) ७८
ब) ४८
क) २८८
ड) ५८

**उत्तरसूची :** ४१) क ४२) अ ४३) अ ४४) क ४५) क ४६) ब ४७) क ४८) अ



४९) महाराष्ट्र विधानसभा सदस्य संख्या किती?
अ) २८८
ब) २८७
क) ४४८
ड) २२०

५०) महाराष्ट्र विधान परिषदेत पदवीधर मतदार संघातून किती सदस्य निवडल्या जातात?
अ) १२
ब) २
क) ७
ड) यापैकी नाही

५१) शिक्षक मतदार संघातून महाराष्ट्र विधानपरीषदेत किती सदस्य निवडले जातात?
अ) ३
ब) ७
क) २
ड) १२

५२) विधानसभा सदस्याद्वारे महाराष्ट्र विधानसभेत किती सदस्य निवडून दिले जातात?
अ) २
ब) १२
क) ३०
ड) यापैकी नाही

५३) स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारा किती सदस्य महाराष्ट्र विधानपरिषदेत निवडले जातात?
अ) २२
ब) १२
क) २१
ड) यापैकी नाही

५४) लोकसभा सभागृहाच्या निवडणूकीत मतदाराची पात्रता कोणती?
अ) भारतीय नागरीक
ब) वयाची १८ वर्षे पूर्ण
क) मतदारसंघाच्या मतदार यादीत नाव
ड) वरील सर्व

५५) विधानसभा सभागृहाच्या निवडणूकीत मतदाराची पात्रता कोणती?
अ) भारतीय नागरीक
ब) वयाची १८ वर्षे पूर्ण
क) मतदारसंघाच्या मतदार यादीत नाव
ड) वरील सर्व

**उत्तरसूची :** ४९) अ ५०) क ५१) ब ५२) क ५३) अ ५४) ड ५५) ड

५६) महाराष्ट्र विधानपरीषद सभागृहात पदवीधर मतदार संघातून किती सभासद निवडले जातात?

अ) सात ब) पाच

क) चार ड) दोन

५७) महाराष्ट्र विधानपरीषद सभागृहात शिक्षक मतदार संघातून किती सभासद निवडले जातात?

अ) पाच ब) सहा

क) सात ड) यापैकी नाही

५८) विधानपरिषदेमध्ये विधानसभा सदस्याकडून निवडल्या जाणाऱ्या सदस्याला मतदान करणाऱ्या मतदाराने वयाची किती वर्षे पूर्ण केली पाहिजे?

अ) २५ वर्षे ब) ३० वर्षे

क) ३५ वर्षे ड) ४० वर्षे

५९) शिक्षक मतदार संघामध्ये शिक्षक मतदार कोणत्या शिक्षक प्रवर्गातील असावा?

अ) माध्यमिक ब) उच्च माध्यमिक

क) महाविद्यालयातील ड) वरील सर्व

६०) राज्यपालद्वारा किती सदस्य महाराष्ट्रात विधान परिषदेत नियुक्त केले जातात?

अ) २१ ब) १४

क) १५ ड) १२

---

**उत्तरसूची :** ५६) अ ५७) क ५८) अ ५९) ड ६०) ड



## घटक क्र. २

- राज्यपाल पद व्यवस्था
- मुख्यमंत्री पद व्यवस्था
- मंत्रिमंडळ पद व्यवस्था

१) घटक राज्याचा नाममात्र शासन प्रमुख कोण असतो?

अ) मुख्यमंत्री ब) राज्यपाल

क) लोकसभा सभापती ड) पंतप्रधान

२) राज्यपालाची नियुक्ती कोण करतो?

अ) लोकसभा सभापती ब) राष्ट्रपती

क) राज्यसभा अध्यक्ष ड) यापैकी नाही

३) राज्यपालाला पद व गोपनीयतेची शपथ कोण देतो?

अ) राष्ट्रपती

ब) मुख्यमंत्री

क) उच्च न्यायालयाचे न्यायाधीश

ड) लोकसभा सभापती

४) राज्यपाल म्हणून नियुक्तीकरिता वयाचे किती वर्ष पूर्ण झालेले असावे?

अ) २५ वर्षे ब) ३० वर्षे

क) १८ वर्षे ड) ३५ वर्ष

५) राज्यपाल पदाचा कार्यकाळ किती वर्षाचा असतो?

अ) ५ वर्ष ब) ६ वर्षे

क) १० वर्षे ड) यापैकी नाही

---

**उत्तरसूची :** १) ब २) ब ३) क ४) ड ५) अ

६) राज्यपालाची पुनर्नियुक्ती कोण करतो?

अ) राष्ट्रपती ब) पंतप्रधान

क) लोकसभा सभापती ड) मुख्यमंत्री

७) राज्यपालाचे वेतन व भत्ते ठरविण्याचा अधिकार कोणाचा असतो?

अ) राष्ट्रपतीला ब) लोकसभेला

क) राज्यसभेला ड) संसदेला

८) राज्यपाल कायदेकारी सत्ता प्राप्त असल्याने तो .......

अ) कार्यकारी प्रमुख असतो

ब) न्याय विभागाचा प्रमुख

क) कायदेविभागाचा प्रमुख असतो

ड) यापैकी नाही

९) घटकराज्यात कोणाच्या नावावर राज्यकारभार चालतो?

अ) राज्यपाल

ब) मुख्यमंत्री

क) उच्च न्यायालयाचा न्यायाधीश

ड) लोकसभा सभापती

१०) मुख्यमंत्र्याची नियुक्ती कोण करतो?

अ) उच्च न्यायालायाचा न्यायाधीश

ब) राष्ट्रपती

क) उपराष्ट्रपती

ड) राज्यपाल

११) राज्यपालाच्या स्वमताने निर्णय घेण्याच्या अधिकाराला काय म्हणतात?

अ) स्वविवेकाधीन अधिकार

ब) कार्यकारी अधिकार

क) कायदेविषयक अधिकार

ड) आर्थिक अधिकार

१२) घटकराज्यात घटनात्मक शासक कोण असतो?

अ) उपराष्ट्रपती ब) मुख्यमंत्री

क) राज्यपाल ड) यापैकी नाही

---

**उत्तरसूची :** ६) अ ७) ड ८) अ ९) अ १०) ड ११) अ १२) क



१३) घटक राज्यात घटनेनुसार महत्वपूर्ण नियुक्ती कोण करतो?

अ) राज्यपाल ब) उपराष्ट्रपती

क) मुख्यमंत्री ड) लोकसभा सभापती

१४) घटकराज्यात अंदाजपत्रक मांडण्यासाठी कोणाची संमती आवश्यक असते?

अ) राज्यपालाची ब) विधानसभा सभागृह

क) विधान परिषद सभागृह ड) पंतप्रधान

१५) घटक राज्याचा 'प्रथम नागरिक' कोणास संबोधले जाते?

अ) राज्यपाल

ब) उपराष्ट्रपती

क) मुख्यमंत्री

ड) लोकसभा सभापती मुख्यमंत्री

१६) घटक राज्यात राज्यपालांचा स्वविवेकधीन अधिकार सोडून इतर अधिकार कोण वापरतो?

अ) उपराष्ट्रपती ब) राज्यपाल

क) पंतप्रधान ड) मुख्यमंत्री

१७) राज्यपालपदासाठीची पात्रता कोणती?

अ) भारतीय नागरीक

ब) वयाची ३५ वर्षे पूर्ण

क) नियुक्तीपूर्वी आर्थीक लाभचे पद धारण केलेले नसावे

ड) वरीलपैकी सर्व

१८) राज्यपाल आपल्या कार्यकारी अधिकारात कोणती कार्ये करतो?

अ) मुख्यमंत्राची नियुक्ती

ब) घटक राज्य सरकारला मार्गदर्शन

क) घटक राज्याअंतर्गत महत्वपूर्ण नियुक्त्या

ड) वरीलपैकी सर्व

१९) विधीमंडळ अधिवेशनात अभिभाषण कोण करतो?

अ) राज्यपाल ब) मुख्यमंत्री

क) अर्थमंत्री ड) सभापती

२०) घटकराज्य विधिमंडळ अधिवेशन सुरू नसताना अध्यादेश कोण करतो?

अ) मुख्यमंत्री ब) सभापती

क) राज्यपाल ड) यापैकी नाही

---

**उत्तरसूची :** १३) अ १४) अ १५) अ १६) ड १७) ड १८) ड १९) अ २०) क

२१) घटकराज्यात कुणाच्या स्वाक्षरीने विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते?
अ) राज्यपाल ब) विधानसभा सभापती
क) विधानपरीषद सभापती ड) यापैकी सर्व
२२) विधिमंडळाचे विधेयक राज्यपाल कुणाच्या संमतीसाठी राखून ठेवू शकतो?
अ) पंतप्रधानाच्या ब) राष्ट्रपतीच्या
क) न्यायालयाच्या ड) यापैकी नाही
२३) राज्यपाल विधानपरिषदेत किती सदस्यांची नियुक्ती करतो.
अ) १/३ ब) १/५
क) १/६ ड) १/१२
२४) राज्यपाल आपल्या न्यायविषयक कार्यात कोणती कार्ये करतो?
अ) उच्च न्यायालयातील न्यायाधिशाची नियुक्ती करताना राष्ट्रपतीला सल्ला देणे
ब) उच्च न्यायालयातील न्यायधिशांना पद व गोपनियतेची शपथ देणे
क) दुय्यम न्यायालयातील न्यायाधिशांच्या नियुक्त्या उच्च न्यायालयाच्या सल्ल्याने करणे
ड) वरील सर्व
२५) राज्यपाल कुणाचा प्रतिनिधी असतो?
अ) राष्ट्रपती ब) पंतप्रधान
क) न्यायालय ड) यापैकी नाही
२६) राज्यपाल स्वेच्छाधिकाराचा वापर केव्हा करतो?
अ)कुणालाही विधानसभेत बहुमत नसताना मुख्यमंत्री नियुक्त करण्यासंदर्भात
ब) राष्ट्रपतीला अहवाल पाठविताना
क) राष्ट्रपतीच्या संमतीसाठी विधेयक पाठविताना
ड) वरील सर्व
२७) घटकराज्य विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकास राज्यपाल किती वेळा नकार दर्शवू शकतो?
अ) एक वेळा ब) दोन वेळा
क) तिन वेळा ड) चार वेळा
२८) घटक राज्यात वास्तविक शासन प्रमुख कोण?
अ) मुख्यमंत्री ब) राज्यपाल
क) उपराष्ट्रपती ड) लोकसभा सभापती

**उत्तरसूची :** २१) अ २२) ब २३) क २४) ड २५) अ २६) अ २७) अ २८) अ



२९) राज्यपाल व मंत्रिमंडळ यांच्यातील दुवा म्हणून कोण कार्य करते?
अ) राज्यसभेचा अध्यक्ष ब) पंतप्रधान
क) मुख्यमंत्री ड) यापैकी नाही
३०) मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना शपथ कोण देतो?
अ) राज्यपाल ब) पंतप्रधान
क) राज्यसभेचा अध्यक्ष ड) यापैकी नाही
३१) मुख्यमंत्र्यांचा कार्यकाळ?
अ) कायम स्वरूपी
ब) ६ वर्षे
क) विधानसभेत बहुमत असेपर्यंत किंवा ५ वर्ष
ड) यापैकी नाही
३२) मंत्र्याच्या नियुक्तीबाबत प्रत्यक्ष निर्णय कोण घेतो?
अ) मुख्यमंत्री ब) राज्यपाल
क) पंतप्रधान ड) उपराष्ट्रपती
३३) मंत्रिमंडळात विभागाचे वाटप कोण करतो?
अ) राज्यपाल ब) मुख्यमंत्री
क) पंतप्रधान ड) उपराष्ट्रपती
३४) मंत्रिमंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान कोण भूषवितो?
अ) उपराष्ट्रपती ब) राज्यपाल
क) पंतप्रधान ड) मुख्यमंत्री
३५) 'राज्य विधिमंडळाचा नेता' कोणास संबोधले जाते?
अ) राज्यपाल ब) उपराष्ट्रपती
क) मुख्यमंत्री ड) लोकसभा सभापती
३६) घटक राज्यातील नियुक्तीबाबत प्रत्यक्षात निर्णय कोण घेतो?
अ) राज्यपाल ब) उपराष्ट्रपती
क) पंतप्रधान ड) मुख्यमंत्री
३७) 'जनतेचा नेता' कोणास संबोधले जाते?
अ) राज्यपाल ब) उपराष्ट्रपती
क) पंतप्रधान ड) मुख्यमंत्री

**उत्तरसूची :** २९) क ३०) अ ३१) क ३२) अ ३३) ब ३४) ड ३५) क ३६) ड ३७) ड

३८) घटक राज्य मंत्रिमंडळात 'ग्रहमालेतील सूर्य' कोणाला संबोधले जाते?

अ) उपराष्ट्रपती
ब) राज्यपाल
क) पंतप्रधान
ड) मुख्यमंत्री

३९) मुख्यमंत्री म्हणून कुणाला आमंत्रित केल्या जाते?

अ) विधानसभेत बहुमत प्राप्त पक्षाच्या नेत्याला
ब) विधानपरिषदेत बहुमत प्राप्त पक्षाचा नेता
क) विरोधी पक्षनेत्याला
ड) यापैकी नाही

४०) मुख्यमंत्री निवडीसंदर्भात राज्यपाल स्वेच्छाधिकाराचा वापर केव्हा करतो?

अ) बहुमतप्राप्त पक्षाचा नेता मुख्यमंत्री म्हणून ठरवताना
ब) कुणालाही विधानसभेत बहुमत प्राप्त झाले नसताना
क) विधानपरिषदेतून मुख्यमंत्री ठरवताना
ड) यापैकी नाही

४१) मंत्रीमंडळाचा नेता कोण असतो?

अ) मुख्यमंत्री
ब) सभापती
क) उपसभापती
ड) यापैकी नाही

४२) मुख्यमंत्र्याची कार्ये कोणती?

अ) मंत्र्यांमध्ये विभागाचे वाटप
ब) मंत्र्यांना पदमुक्त करणे
क) प्रशासन चालविणे
ड) वरील सर्व

४३) मंत्रीमंडळरूपी कमानीची आधारशीला कोण असतो?

अ) राज्यपाल
ब) राष्ट्रपती
क) मुख्यमंत्री
ड) यापैकी नाही

४४) 'मंत्रीमंडळाचा निर्माता, संरक्षणकर्ता व संहारकर्ता' कोण संबोधला जातो?

अ) राज्यपाल
ब) मंत्री
क) मुख्यमंत्री
ड) विधानसभा सभापती

४५) कोणते पद हे घटनात्मक पद नाही?

अ) उपमुख्यमंत्री
ब) मुख्यमंत्री
क) राष्ट्रपती
ड) पंतप्रधान

---

**उत्तरसूची :** ३८) ड ३९) अ ४०) ब ४१) अ ४२) ड ४३) क ४४) क ४५) अ



४६) मुख्यमंत्र्याच्या अनुपस्थितीत मंत्रीमंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान कोण भूषवितो?

अ) राज्यपाल
ब) राष्ट्रपती
क) सभापती
ड) यापैकी नाही

४७) मुख्यमंत्री कोणत्या सभागृहाचा सदस्य असावा किंवा बनावा?

अ) विधानसभा
ब) विधानसभा किंवा विधान परीषद
क) विधानपरीषद
ड) यापैकी नाही

४८) कुठल्याही सभागृहाचा सदस्य नसेल तर नियुक्तीपासून किती कालावधीत मुख्यमंत्र्याने विधीमंडळ सभागृहाचे सभासद बनले पाहिजे?

अ) सहा महिने
ब) एक वर्ष
क) तिन महिने
ड) पाच महिने

४९) घटकराज्य मंत्रिमंडळात विधानसभा सभासद संख्येच्या किती टक्के मंत्री घेतले जावे?

अ) १५%
ब) १८%
क) २०%
ड) २५%

५०) महाराष्ट्र मंत्रिमंडळात किती सदस्य राहू शकतात?

अ) ४२
ब) ४३
क) २८
ड) ५८

५१) संपूर्ण मंत्रिमंडळ केव्हा बरखास्त होते?

अ) सभापतीने राजीनामा दिल्यास
ब) मुख्यमंत्र्याने राजीनामा दिल्यास
क) राज्यपालाने राजीनामा दिल्यास
ड) यापैकी नाही

५२) घटक राज्य मंत्रिमंडळावर अविश्वास ठराव मंजूर करून कोण पदमुक्त करू शकतो?

अ) विधानसभा सभागृह
ब) विधान परिषद सभागृह
क) पंतप्रधान
ड) मुख्यमंत्री

---

**उत्तरसूची :** ४६) ड ४७) ब ४८) अ ४९) अ ५०) ब ५१) ब ५२) अ

५३) मंत्री कुणाच्या मर्जी असेपर्यंत पदावर राहू शकते?

अ) विधानसभा सभागृह

ब) विधान परीषद सभागृह

क) पंतप्रधान

ड) मुख्यमंत्री

५४) सर्वसाधारणपणे मंत्रिमंडळाचा कार्यकाळ किती?

अ) ६ वर्ष ब) २ वर्षे

क) १० वर्षे ड) ५ वर्ष

५५) मंत्रिमंडळाची बैठक म्हणजे?

अ) कॅबिनेट मंत्र्यांची बैठक

ब) संपूर्ण मंत्रीमंडळाची बैठक

क) राज्यमंत्राची बैठक

ड) यापैकी नाही

५६) राज्यपालाला कितव्या कलमाद्वारे मंत्रिमंडळ निर्मितीचा अधिकार आहे?

अ) कलम १६३ ब) कलम २२१

क) कलम २२८ ड) कलम ३६८

५७) मंत्रीमंडळाची सदस्य संख्या कोणत्या घटनादुरूस्तीनुसार निश्चित करण्यात आली?

अ) ९२ वी ब) ९१ वी

क) ९३ वी ड) ९४ वी

५८) विधिमंडळ सदस्य नसलेल्या मंत्रीमंडळ सदस्याने नियुक्तीपासून किती कालावधीत विधिमंडळ सदस्यत्व प्राप्त करायला हवे?

अ) ३ महिने ब) ५ महिने

क) ६ महिने ड) यापैकी नाही

५९) मंत्रीमंडळाची बैठक कोण बोलावितो?

अ) राज्यपाल ब) सभापती

क) मुख्यमंत्री ड) यापैकी नाही

६०) मंत्रीमंडळाअंतर्गत मंत्र्यांचा कोणता प्रकार श्रेष्ठ असतो?

अ) राज्यमंत्री ब) उपमंत्री

क) बिनखात्याचे मंत्री ड) कॅबिनेट मंत्री

---

**उत्तरसूची :** ५३) ड ५४) ड ५५) अ ५६) अ ५७) ब ५८) क ५९) क ६०) ड



६१) मंत्रिमंडळ कोणत्या तत्त्वानुसार कार्य करते?

अ) सामुहिक जबाबदारी ब) एकनेतृत्व

क) एकता ड) वरील सर्व

६२) मंत्री आपला राजीनामा कोणाकडे सादर करतात?

अ) राज्यपाल ब) मुख्यमंत्री

क) सभापती ड) यापैकी नाही

६३) मुख्यमंत्री आपला राजीनामा कोणाकडे देतो?

अ) राज्यपाल ब) विधानसभा सभापती

क) न्यायाधीश ड) यापैकी नाही

६४) घटक राज्य मंत्रीमंडळाला अविश्वास ठरावाद्वारे कोणते सभागृह पदमुक्त करू शकते?

अ) विधानपरीषद ब) विधानसभा

क) राज्यसभा ड) लोकसभा

६५) घटकराज्याचे कार्यकारी मंडळ कुणाला संबोधले जाते?

अ) मंत्रिमंडळ ब) विधानसभा

क) विधानपरिषद ड) यापैकी नाही

६६) खालीलपैकी राज्यमंत्रीमंडळाची कार्ये कोणती?

अ) प्रशासन चालविणे ब) धोरण ठरविणे

क) अर्थविधेयक तयार करणे ड) वरील सर्व

६७) सद्यस्थितीत (२०२०) मध्ये महाराष्ट्राचे राज्यपाल कोण आहेत?

अ) भगत सिंग कोश्यारी ब) विद्यासागर राव

क) शंकर नारायणन ड) एस सी जमीर

६८) राज्यपालांची नियुक्ती खालीलपैकी कोणाकडून होते?

अ) मुख्यमंत्री ब) राष्ट्रपती

क) पंतप्रधान ड) सर्व पर्याय चूक

६९) राज्यघटनेत राज्यपालपदासाठी खालीलपैकी पात्रता निश्चित करण्यात आलेली आहे. योग्य पर्याय ओळखा

अ) वयाची २५ वर्षे पूर्ण, मान्यताप्राप्त पक्षाचे सदस्यत्व

ब) केंद्र व राज्य स्तरावर मोठ्या पदावर नियुक्त, आरक्षित घटक

क) भारताचे नागरिकत्व, वयाची ३५ वर्षे पूर्ण

ड) सर्व पर्याय बरोबर

---

**उत्तरसूची :** ६१) ड ६२) ब ६३) अ ६४) ब ६५) अ ६६) ड ६७) अ ६८) ब ६९) क

७०) राज्यपाल या पदाचा कालावधी किती वर्षांचा असतो?
अ) १० वर्षे
ब) ३ वर्षे
क) २ वर्षे
ड) ५ वर्षे

७१) राज्यपालपद ग्रहण करताना राज्यपालांना कोणती व्यक्ती शपथ देते?
अ) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश शपथ देतात.
ब) राज्याचे मुख्यमंत्री शपथ देतात.
क) विधान परिषदेचे अध्यक्ष शपथ देतात.
ड) सर्व पर्याय चूक

७२) राज्यपाल पद ग्रहण करतेवेळी जी शपथ दिली जाते त्या शपथेत खालीलपैकी कोणत्या पर्याय समाविष्ट असतो?
अ) स्वतःच्या मर्जीने कार्य करणे, वेळोवेळी पक्षहित बघणे, निष्ठावंतांना न्याय देणे इ.
ब) निष्ठापूर्वक कार्य करणे, राज्यघटना व कायद्याचे जतन करणे, जनतेच्या कल्याणासाठी वाहून घेणे इ.
क) पक्षहितासाठी राज्याकडे दुर्लक्ष करणे, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या अधिकारांमध्ये वेळोवेळी हस्तक्षेप करणे इ.
ड) सर्व पर्याय बरोबर

७३) भारतीय घटनेच्या कोणत्या कलमान्वये राज्याची कार्यकारी सत्ता राज्यपालांकडे असते?
अ) कलम-१५३
ब) कलम-१५२
क) कलम-१५४
ड) कलम-१५६

७४) एस. एम. कृष्णा या राज्यपालांचा कार्यकाळ कोणता? पर्याय ओळखा.
अ) मार्च २००३ ते नोव्हेंबर २००७
ब) एप्रिल २००२ ते मार्च २००६
क) ऑक्टोबर २००५ ते नोव्हेंबर २००९
ड) डिसेंबर २००४ ते मार्च २००८

७५) राष्ट्रपती राजवटीवेळी राष्ट्रपतींच्या वतीने राज्याचा कारभार कोण पाहते?
अ) राज्यपाल
ब) मुख्यमंत्री
क) उपमुख्यमंत्री
ड) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश

---

**उत्तरसूची :** ७०) ड ७१) अ ७२) ब ७३) क ७४) ड ७५) अ



७६) विशिष्ट परिस्थितीत राज्यपालांना स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार निर्णय घेता येतात. ते अधिकार कोणते? सर्वात योग्य पर्याय ओळखा.
अ) विधानसभा बरखास्त करणे, मंत्रिमंडळ बडतर्फ करणे, राष्ट्रपती राजवटीची शिफारस करणे इ.
ब) विधानसभा बरखास्त करणे, नकाराधिकाराचा वापर करणे, मुख्यमंत्री यांची नेमणूक करणे, मंत्रिमंडळ बडतर्फ करणे, राष्ट्रपती राजवटीची शिफारस करणे इ.
क) मुख्यमंत्री यांची नेमणूक करणे, मंत्रिमंडळ बडतर्फ करणे इ.
ड) राज्यपालांना काहीच अधिकार नसतात.

७७) राज्यपाल राष्ट्रपती राजवटीची शिफारस केव्हा करू शकतात?
अ) स्वतःच्या मर्जीने, कोणत्याही वेळी
ब) पक्षहितास बाधा येत असल्यास
क) अस्थिर शासन किंवा राजकीय परिस्थिती
ड) सर्व पर्याय चूक

७८) भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या कलमानुसार राज्यपालांना मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रीमंडळ असेल, अशी तरतूद करण्यात आलेली आहे.
अ) कलम-१६४
ब) कलम-१६७
क) कलम-१६५
ड) कलम-१६३

७९) सद्यस्थितीत (२०२०) महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री कोण आहेत?
अ) उद्धव ठाकरे
ब) देवेंद्र फडणीस
क) पृथ्वीराज चव्हाण
ड) अशोक चव्हाण

८०) २०१४ या वर्षीच्या कोणत्या काळात महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट होती?
अ) १९ मार्च २०१४ ते २२ एप्रिल २०१४
ब) २८ सप्टेंबर २०१४ ते ३१ ऑक्टोबर २०१४
क) १२ नोव्हेंबर २०१४ ते २८ डिसेंबर २०१४
ड) सर्व पर्याय चूक

८१) ''चिन्हांनी टिंबांकित केलेल्या रेषेवर घटनात्मक राज्यपाल ह्या नात्याने स्वाक्षरी करणे या पलीकडे माझे कोणतेच कार्य नव्हते.'' हे उद्गार कोणाचे?
अ) श्रीप्रकाश
ब) मोहम्मद फजल
क) एस सी जमीर
ड) पी सी अलेक्झांडर

---

**उत्तरसूची :** ७६) ब ७७) क ७८) ड ७९) अ ८०) ब ८१) अ

८२) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा कार्यकाळ कोणता?
अ) १ मे १९६० ते १९ नोव्हेंबर १९६४
ब) १ मे १९६० ते १९ नोव्हेंबर १९६२
क) १ मे १९६१ ते १९ नोव्हेंबर १९६२
ड) सर्व पर्याय चूक

८३) राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे प्रमुख अधिकार व कार्ये कोणती? खालीलपैकी योग्य पर्याय ओळखा.
अ) मंत्रीमंडळाचे नेतृत्व करणे, जनतेचा नेता म्हणून कार्य करणे, पक्षाचे नेतृत्व करणे, राज्यपालांना मदत करणे इ.
ब) खातेवाटप व खातेपालट करणे, विधानसभेतील कामकाजांचे नियमन, नियंत्रण ठेवणे, राज्यपालांना मदत करणे इ.
क) खातेवाटप व खातेपालट करणे, विधानसभेतील कामकाजांचे नियमन, नियंत्रण ठेवणे, मंत्रीमंडळाचे नेतृत्व करणे, त्यांच्यात समन्वय साधणे, बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारणे, जनतेचा नेता म्हणून कार्य करणे, पक्षाचे नेतृत्व करणे, राज्यपालांना मदत करणे इ.
ड) सर्व पर्याय चूक

८४) महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदी सर्वाधिक काळ खालीलपैकी कोणती व्यक्ती विराजमान होती? योग्य पर्याय निवडा.
अ) वसंतदादा पाटील ब) बॅ. अंतुले
क) विलासराव देशमुख ड) शरद पवार

८५) घटक राज्याची वास्तविक सत्ता कोणाच्या हातात असते?
अ) मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ ब) राज्यपाल
क) उच्च न्यायालयाचे न्यायाधीश ड) विधान परिषदेचे अध्यक्ष

८६) फेब्रुवारी १९९९ ते ऑक्टोबर १९९९ या कालावधीत महाराष्ट्रात खालीलपैकी कोणती व्यक्ती मुख्यमंत्रीपदावर विराजमान होती?
अ) सुशीलकुमार शिंदे ब) नारायण राणे
क) मनोहर जोशी ड) विलासराव देशमुख

८७) माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा खालीलपैकी कार्यकाळ कोणता?
अ) डिसें.१९६४ ते फेब्रु.१९७६ ब) डिसें.१९६२ ते फेब्रु.१९७४
क) डिसें.१९६३ ते फेब्रु.१९७५ ड) डिसें.१९६१ ते फेब्रु.१९७३

---

**उत्तरसूची :** ८२) ब ८३) क ८४) ड ८५) अ ८६) ब ८७) क



८८) संसदीय लोकशाही असलेल्या भारत देशातील घटक राज्यात राज्यपाल हे ........ प्रमुख तर मुख्यमंत्री हे ........ प्रमुख असतात.
अ) नामधारी, वास्तविक ब) वास्तविक, नामधारी
क) नामधारी, नामधारी ड) वास्तविक, वास्तविक

८९) खालीलपैकी कोणता पर्याय आहे ते सांगा.
पर्याय १ : मुख्यमंत्र्यांनी आपल्या मंत्रीमंडळाच्या तयार केलेल्या यादीनुसार राज्यपालांना मंत्रीमंडळाची नियुक्ती करावी लागते.
पर्याय २ : मंत्रीमंडळ तयार करताना राज्यपाल जी यादी तयार करतात त्या यादीला मुख्यमंत्री मान्यता देतात.
अ) फक्त पर्याय (२) बरोबर ब) पर्याय (१) व (२) दोन्ही बरोबर
क) फक्त पर्याय (१) चूक ड) फक्त पर्याय (१) बरोबर

९०) ........ नुसार राज्यात आणीबाणीच्या वेळी राष्ट्रपती राजवट लागू असताना राष्ट्रपतींच्या वतीने राज्याचा कारभार राज्यपाल चालवतात.
अ) कलम-३५६ ब) कलम-३५७
क) कलम-३५५ ड) सर्व पर्याय चूक

---

**उत्तरसूची :** ८८) अ ८९) ड ९०) अ

## घटक क्र. ३

- घटकराज्य विधिमंडळ व्यवस्था
- विधानसभा सभागृह
- विधानपरिषद सभागृह

१) भारतात किती घटक राज्ये आहेत?
अ) २८ ब) २९
क) २६ ड) ३६

२) भारतात किती राज्यांमध्ये विधानसभा सभागृह अस्तित्वात आहे?
अ) २८ ब) २९
क) २६ ड) ३६

३) भारतात किती घटक राज्यांमध्ये विधानपरिषद सभागृह अस्तित्वात आहे?
अ) ६ ब) ५
क) ४ ड) ३

४) भारतात किती राज्यांमध्ये विधिमंडळ द्विसभागृही आहे?
अ) ६ घटक राज्यांमध्ये ब) ४ घटक राज्यामध्ये
क) ७ घटक राज्यांमध्ये ड) १० घटक राज्यामध्ये

५) घटक राज्यात वरिष्ठ व द्वितीय सभागृह कोणते?
अ) विधानसभा ब) लोकसभा
क) राज्यसभा ड) विधान परिषद

६) विधानपरिषद निर्माण किंवा बरखास्त करण्याचा ठराव कोण करते?
अ) विधानसभा ब) विधानपरिषद
क) लोकसभा ड) राज्यसभा

---

**उत्तरसूची :** १) अ २) अ ३) अ ४) अ ५) ड ६) अ



७) कोणत्या कलमानुसार संसद व विधान परिषद निर्माण व बरखास्त करण्यात येते?
अ) कलम १६९ ब) कलम १७०
क) कलम २२८ ड) कलम ३६८

८) राज्यघटनेमध्ये विधानपरिषदेची व्यवस्था कितव्या कलमात स्पष्ट केलेले आहे?
अ) कलम १६९ ब) कलम १७०
क) कलम २२८ ड) कलम १६८

९) विधानसभेत किती बहुमताने विधान परिषद निर्माण किंवा बरखास्त केल्या जाते?
अ) २/३ ब) २/५
क) १/३ ड) १/१२

१०) विधान परिषदेत कमीत कमी किती सदस्य असावे?
अ) ३० ब) ४८
क) ४० ड) यापैकी नाही

११) विधानसभा सभासद संख्येच्या कितीपेक्षा जास्त विधानपरिषदेत सदस्य संख्या नसावी?
अ) १/१२ ब) १/८
क) १/३ ड) १/७

१२) महाराष्ट्र विधान परिषदेची सभासद संख्या?
अ) ७८ ब) ४८
क) १०० ड) २८८

१३) विधान परिषदेत विधानसभा सदस्यद्वारे किती सदस्य निवडले जातात?
अ) १/१२ ब) १/८
क) १/३ ड) १/७

१४) विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारा किती सदस्य निवडले जातात?
अ) २/३ ब) २/५
क) १/३ ड) १/१२

---

**उत्तरसूची :** ७) अ ८) ड ९) अ १०) क ११) क १२) अ १३) क १४) क

१५) पदवीधरांमार्फत किती सदस्य निवडले जातात?

अ) २/३ | ब) २/५
क) १/३ | ड) १/१२

१६) शिक्षकांमार्फत किती सदस्य निवडले जातात?

अ) १/१२ | ब) १/८
क) १/३ | ड) १/७

१७) राज्यपाल यांच्याद्वारे किती सदस्य निवडले जातात?

अ) १/१२ | ब) १/६
क) १/३ | ड) १/७

१८) विधान परिषदेकरता उमेदवाराचे वय किती असावे?

अ) ३० | ब) ३५
क) २५ | ड)१८

१९) विधान परिषदेची निवडणूक पद्धत?

अ) एकल संक्रमणीय पद्धत | ब) विशेष बहुमत
क) आवाजी मतदान पद्धती | ड) यापैकी नाही

२०) विधानसभा सभागृहाचा कार्यकाळ किती?

अ) ५ वर्ष | ब) ६ वर्ष
क) ४ वर्ष | ड) यापैकी नाही

२१) विधानपरिषद सभागृहाचा कार्यकाळ किती?

अ) ६ वर्ष | ब) स्थायी सभागृह
क) ४ वर्ष | ड) यापैकी नाही

२२) विधानसभा सदस्याचा कार्यकाळ किती?

अ) ५ वर्ष | ब) ६ वर्ष
क) ४ वर्ष | ड) यापैकी नाही

२३) विधान परिषद सदस्यांचा कार्यकाळ किती?

अ) ५ वर्ष | ब) ६ वर्ष
क) ४ वर्ष | ड) यापैकी नाही

२४) विधान परिषदेचे सदस्य किती वर्षांनी निवृत्त होतात?

अ) २ वर्षांनी | ब) ६ वर्ष
क) ४ वर्ष | ड) यापैकी नाही

**उत्तरसूची :** १५) ड १६) अ १७) ब १८) अ १९) अ २०) अ २१) ब २२) अ २३) ब २४) अ



२५) विधानसभा, विधान परिषदेची गणसंख्या किती?

अ) १/३ | ब) १/८
क) १/१० | ड) १/७

२६) विधानपरिषदेत कामकाज सुरु होण्यासाठी कमीत कमी सदस्यांची उपस्थिती आवश्यक असते?

अ) १० | ब) ८
क) ३ | ड) ७

२७) विधानसभा किंवा विधानपरिषदेत किती प्रतिशतमध्ये प्राप्त न झाल्यास अनामत रक्कम जमा होते?

अ) १/७ | ब) १/८
क) १/३ | ड) १/६

२८) विधिमंडळाच्या २ अधिवेशनामध्ये किती महिन्यांपेक्षा जास्त कालावधी असू नये?

अ) ६ | ब) ८
क) ३ | ड) ७

२९) महाराष्ट्र विधिमंडळाची एका वर्षात किती अधिवेशने होतात?

अ) १० | ब) ८
क) ३ | ड) ७

३०) महाराष्ट्रात हिवाळी अधिवेशन कुठे होते?

अ) नागपूर | ब) औरंगाबाद
क) मुंबई | ड) पूणे

३१) उन्हाळी अधिवेशनाला काय म्हणतात?

अ) अर्थसंकल्पीय | ब) पावसाळी
क) हिवाळी | ड) यापैकी नाही

३२) राज्यपाल विधानसभेत अँग्लो इंडियन जमातीचे किती प्रतिनिधी नियुक्त करीत असत?

अ) १ प्रतिनिधी | ब) १२ प्रतिनिधी
क) २ प्रतिनिधी | ड) यापैकी नाही

३३) विधानसभेचा सभासद बनण्यासाठी कमीत कमी वय किती?

अ) २० वर्ष | ब) १८ वर्ष
क) ३५ वर्ष | ड) २५ वर्ष

**उत्तरसूची :** २५) क २६) अ २७) ड २८) अ २९) क ३०) अ ३१) अ ३२) अ ३३) ड

३४) विधानसभेची जास्तीत जास्त सभासद संख्या किती?

अ) ५००    ब) ४८८

क) ४९८    ड) २८८

३५) विधानसभेची कमीत कमी सभासद संख्या किती?

अ) ६०    ब) ४८

क) २८८    ड) १८

३६) महाराष्ट्र विधानसभेची सभासद संख्या किती?

अ) ५००    ब) ४८८

क) ४९८    ड) २८८

३७) प्रौढ मताधिकारानुसार विधानसभेसाठी मतदाराची वयोमर्यादा?

अ) २० वर्ष    ब) १८ वर्ष

क) ३५ वर्ष    ड) २५ वर्ष

३८) विधानसभा सदस्यत्वासाठी पात्रता कोणत्या?

अ) भारतीय नागरीक

ब) वयाची २५ वर्ष पूर्ण

क) मनोरूग्ण व गुन्हेगार घोषित झालेला नसावा

ड) वरील सर्व

३९) महाराष्ट्र विधानसभेची गणसंख्या किती आहे?

अ) २९    ब) ४८

क) २८    ड) १८

४०) विधानसभेत कोणत्या मतदान पद्धतीनुसार सदस्य निवडले जातात?

अ) क्रमदेय    ब) एकल संक्रमणीय

क) प्रौढ गुप्त    ड) यापैकी नाही

४१) विधानसभेचे अध्यक्ष कोण निवडतो?

अ) उपराष्ट्रपती    ब) राज्यपाल

क) पंतप्रधान    ड) विधानसभा सदस्य

४२) विधानसभेची निवडणूक पद्धत?

अ) प्रत्यक्ष निवडणूक पद्धत

ब) अप्रत्यक्ष निवडणूक पद्धत

क) एकल संक्रमणीय पद्धत

ड) यापैकी नाही

**उत्तरसूची :** ३४) अ ३५) अ ३६) ड ३७) ब ३८) ड ३९) अ ४०) क ४१) ड ४२) अ



४३) अर्थ विधेयक प्रथम कोणत्या सभागृहात मांडले जाते?

अ) विधानसभा सभागृह    ब) विधानपरिषद सभागृह

क) राज्यसभा    ड) यापैकी नाही

४४) अर्थ विधेयक मांडण्यास कोणाची परवानगी घेतल्या जाते?

अ) मुख्यमंत्री    ब) अर्थमंत्री

क) पंतप्रधान    ड) राज्यपाल

४५) अर्थ विधेयक कोण मांडतो?

अ) मुख्यमंत्री    ब) अर्थमंत्री

क) पंतप्रधान    ड) राज्यपाल

४६) विधानपरिषद अर्थविधेयकाला किती विलंब लावू शकतो?

अ) १४ दिवस    ब) २८ दिवस

क) १५ दिवस    ड) कितीही

४७) विधानसभेच्या बहुमताने विधानपरिषद बरखास्त किंवा निर्माण करण्याचा ठराव केला जातो?

अ) २/३ बहुमत    ब) १/३ बहुमत

क) २/५ बहुमत    ड) १/८ बहुमत

४८) मुख्यमंत्र्यांवर अविश्वासाचा ठराव कोण मांडू शकतो?

अ) विधानसभा सदस्य    ब) अर्थमंत्री

क) पंतप्रधान    ड) राज्यपाल

४९) वरिष्ठ व प्रथम सभागृह कोणते?

अ) विधानसभा सभागृह

ब) विधानपरीषद सभागृह

क) राज्यसभा

ड) यापैकी नाही

५०) राज्यसभेत महाराष्ट्र विधानसभा किती प्रतिनिधी पाठवतो?

अ) १९ सदस्य    ब) २८ सदस्य

क) ३५ सदस्य    ड) ४८ सदस्य

५१) विधानसभेमध्ये अध्यक्षांच्या अनुपस्थितीत कोण कामकाज सांभाळतो?

अ) उपाध्यक्ष    ब) अध्यक्ष

क) सभापती    ड) यापैकी नाही

**उत्तरसूची :** ४३) अ ४४) ड ४५) ब ४६) अ ४७) अ ४८) अ ४९) अ ५०) अ ५१) अ

५२) महाराष्ट्र विधिमंडळातील शक्तिशाली सभागृह कोणते?
अ) विधानसभा सभागृह
ब) विधानपरिषद सभागृह
क) राज्यसभा
ड) यापैकी नाही

५३) विधानसभा सदस्याच्या अधिकाराचे रक्षण करण्याची जबाबदारी कुणाची असते?
अ) विधानसभा अध्यक्षाची | ब) मुख्यमंत्र्यांची
क) राज्यपालाची | ड) राष्ट्रपतीची

५४) विधानसभा उपसभापती कुणाकडे राजीनामा देतो?
अ) विधानसभा अध्यक्ष | ब) मुख्यमंत्री
क) राज्यपाल | ड) यापैकी नाही

५५) अर्थविधेयक निश्चित करण्याचा अधिकार कोणाला आहे?
अ) विधानसभा अध्यक्षाला | ब) विधानपरिषद अध्यक्षाला
क) मुख्यमंत्र्यांना | ड) यापैकी नाही

५६) विधानपरिषद निर्माण करण्यासंबंधी कायदा करण्याचा अधिकार कोणाला आहे?
अ) संसद | ब) लोकसभा
क) राज्यसभा | ड) विधानसभा

५७) भारतात कोणत्या राज्याची विधानसभा सदस्य संख्या सर्वाधिक आहे?
अ) उत्तर प्रदेश | ब) महाराष्ट्र
क) गोवा | ड) दिल्ली

५८) भारतीय घटनेनुसार विधानसभेमध्ये किती सदस्य असू शकतात?
अ) कमीत कमी ६० व जास्तीत जास्त ५००
ब) कमीत कमी ५० व जास्तीत जास्त ५००
क) कमीत कमी ६० व जास्तीत जास्त ४००
ड) कमीत कमी ७० व जास्तीत जास्त ५००

५९) विधानपरिषदेत किती प्रकारच्या सदस्यांचा समावेश होतो?
अ) ५ | ब) ६
क) ७ | ड) यापैकी नाही

**उत्तरसूची :** ५२) अ ५३) अ ५४) अ ५५) अ ५६) अ ५७) अ ५८) अ ५९) अ



६०) विधानपरिषद सदस्यांची निवड कोणत्या पद्धतीनी केल्या जाते?
अ) क्रमदेय एकल संक्रमणिय प्रमाणाशिर
ब) साध्या बहुमताने
क) खुल्या मतदान पद्धतीने
ड) यापैकी नाही

६१) कोणतेही सामान्य विधेयक प्रथम विधानपरिषदेत मांडता येते का?
अ) होय | ब) नाही
क) कधी कधी | ड) यापैकी नाही

६२) विधानपरिषदेत मंत्रीमंडळावर अविश्वास प्रस्ताव मांडता येतो का?
अ) नाही | ब) होय
क) कधी कधी | ड) यापैकी नाही

६३) विधानपरिषदेत एखादा सदस्य किती दिवस गैरहजर राहिल्यास त्याचे सदस्यत्व रद्द होते?
अ) ६ महिने | ब) २ महिने
क) ४ महिने | ड) ३ महिने

६४) राज्याच्या राजकारणात विधानपरिषदेचे स्थान कोणते आहे?
अ) दुय्यम | ब) शक्तीशाली
क) महत्त्वाचे | ड) यापैकी नाही

६५) विधानसभा कोणाचे प्रतिनिधित्व करते?
अ) सामान्य जनता | ब) राज्याचे
क) केंद्राचे | ड) खासदार

६६) महाराष्ट्र विधानसभेत अनुसूचित जातीसाठी किती जागा राखीव आहेत?
अ) २२ | ब) २४
क) २७ | ड) २९

६७) महाराष्ट्र विधानसभेत अनुसूचित जमातीसाठी किती जागा राखीव आहेत?
अ) १८ | ब) २२
क) २५ | ड) २७

६८) विधानसभा निवडणूक लढविण्याला किती मतदार सूचक व अनूमोदक म्हणून आवश्यक असतात?
अ) १०-१० | ब) २०-२०
क) १५-१५ | ड) २५-२५

**उत्तरसूची :** ६०) अ ६१) ब ६२) अ ६३) ब ६४) अ ६५) अ ६६) अ ६७) अ ६८) अ

६९) विधानसभा ........ सभागृह आहे.
अ) अस्थायी — ब) स्थायी
क) वरिष्ठ — ड) यापैकी नाही

७०) मंत्रिमंडळावर विधानसभा कोणत्या मार्गाने नियंत्रण ठेवते?
अ) लक्षवेधी सूचना — ब) संघ
क) हरताळ — ड) मोर्चा

७१) राज्यातून राज्यसभा सदस्यांना निवडून देण्याचा अधिकार कोणत्या सभागृहातील सदस्यांना आहे?
अ) विधानसभा — ब) विधानपरिषद
क) लोकसभा — ड) यापैकी नाही

७२) राज्यविधिमंडळात विधानसभेचे स्थान कसे आहे?
अ) शक्तिशाली — ब) कमजोर
क) दुय्यम — ड) यापैकी नाही

७३) राष्ट्रपतींच्या निवडणूकीत कोणत्या सभागृहातील सदस्य मतदान करतात?
अ) विधानसभा — ब) विधानपरिषद
क) जिल्हा परिषद — ड) यापैकी नाही

७४) भारतीय राज्यघटनेच्या ........ नुसार भारतात राज्याचे स्वतंत्र विधीमंडळ आहे.
अ) कलम-१६६ — ब) कलम-१६७
क) कलम-१६९ — ड) कलम-१६८

७५) भारतात एकगृही विधिमंडळाला ........ असे म्हटले जाते.
अ) विधानसभा — ब) विधानपरिषद
क) केंद्रीय सभा — ड) सर्व पर्याय चूक

७६) ........ हे राज्य विधिमंडळाचे वरिष्ठ सभागृह असून ते स्थानिक स्वराज्य संस्थेचे तसेच शिक्षक, पदवीधर इ. चे प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे.
अ) विधानसभा — ब) विधानपरिषद
क) केंद्रीय सभा — ड) सर्व पर्याय चूक

७७) कलम-१७१ नुसार विधानपरिषदेची सभासद संख्या कमीत कमी ........ तर जास्तीत जास्त ........ इतकी निश्चित करण्यात आली आहे.
अ) ३०, ९० — ब) ५०, ११०
क) ४०, १०० — ड) ६०, १२०

**उत्तरसूची :** ६९) अ ७०) अ ७१) अ ७२) अ ७३) अ ७४) ड ७५) अ ७६) ब ७७)



७८) विधान परिषदेतील सदस्यांचा कार्यकाळ किती वर्षांचा असतो?
अ) ४ वर्षे — ब) ५ वर्षे
क) ३ वर्षे — ड) ६ वर्षे

७९) महाराष्ट्रात विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन कोणत्या ठिकाणी होते?
अ) नागपूर — ब) मुंबई
क) पुणे — ड) नाशिक

८०) विधानपरिषेत अध्यक्षांच्या अनुपस्थितीत त्यांची कामे कोण करते?
अ) मुख्यमंत्री — ब) उपाध्यक्ष
क) कोणीच नाही — ड) अ, ब पर्याय बरोबर

८१) विधानपरिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्षांना बडतर्फ करण्याचा अधिकार कोणाला असतो?
अ) विधानपरिषद — ब) विधानसभा
क) मुख्यमंत्री — ड) विरोधी पक्ष नेता

८२) महाराष्ट्रातील विधानपरिषदेची उन्हाळी व पावसाळी अधिवेशन अनुक्रमे कोणत्या ठिकाणी संपन्न होतात?
अ) पुणे, नाशिक — ब) मुंबई, मुंबई
क) नागपूर, मुंबई — ड) नागपूर, नागपूर

८३) भारतीय राज्यघटनेच्या ........ नुसार प्रत्येक घटक राज्यात विधानसभेची स्थापना करण्यात आली आहे.
अ) कलम-१६९ — ब) कलम-१६७
क) कलम-१७० — ड) कलम-१७१

८४) महाराष्ट्र जनतेचे प्रतिनिधित्व करणारे अस्थायी स्वरूपाचे सभागृह कोणते?
अ) विधानपरिषद — ब) जिल्हा परिषद
क) ग्रामसभा — ड) विधानसभा

८५) लोकप्रतिनिधींची निवड करण्यासाठी किती वर्षे पूर्ण असावी लागतात?
अ) १८ वर्षे — ब) २१ वर्षे
क) १६ वर्षे — ड) सर्व पर्याय चूक

८६) निवडणूक खर्चाचा हिशोब सादर न केल्यास विधानसभेचे सदस्य अपात्र होवून त्यांचे सभासदत्व रद्द होवू शकते का?
अ) नाही — ब) होय
क) अर्धसत्य आहे — ड) सर्व पर्याय चूक

**उत्तरसूची :** क ७८) ड ७९) अ ८०) ब ८१) अ ८२) ब ८३) क ८४) ड ८५) अ ८६) ब

८७) २००९ ते २०१४ या कार्यकाळात खालीलपैकी महाराष्ट्र विधानसभेचे सभापती कोणती व्यक्ती होती?
अ) हरिभाऊ बागडे
ब) बाबासाहेब कुपेकर
क) दिलीप वळसे-पाटील
ड) अरुण गुजराथी

८८) विधानसभेची बैठक सुरू होण्यासाठी एकूण सभासदांच्या ........ सभासद असणे आवश्यक आहे.
अ) १/४
ब) १/६
क) २/१०
ड) १/१०

८९) विधानसभेचे सभापती हे बहुधा ........ पक्षाचे तर उपसभापती हे ........ पक्षाचे सदस्य असतात.
अ) सत्ताधारी, विरोधी
ब) विरोधी, सत्ताधारी
क) विरोधी, विरोधी
ड) सत्ताधारी, सत्ताधारी

९०) १९३७ ते १९४६ या कार्यकाळात खालीलपैकी महाराष्ट्र विधानसभेचे सभापती कोणती व्यक्ती होती?
अ) द. वा. कुंटे
ब) ग. वा. माळवणकर
क) कुंदनलाल फिरोदिया
ड) सर्व पर्याय चूक

## घटक क्र. ४

- महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रकार – शहरी/ग्रामीण
- महानगरपालिका
- ग्रामपंचायत व ग्रामसभा

१) स्वतंत्र भारतात प्रथम पंचायत राज व्यवस्था कधी व कुठे लागू झाली?
अ) २ ऑक्टोबर १९५९ नागोर (राजस्थान)
ब) ५ ऑगस्ट १९६० मुंबई (महाराष्ट्र)
क) १४ ऑक्टोबर १९५९ नागोर (राजस्थान)
ड) २० जानेवारी १९६० ग्वाल्हेर (मध्य प्रदेश)

२) महाराष्ट्रात पंचायत राज व्यवस्था कधी लागू झाली?
अ) १ मे १९६२
ब) १५ ऑगस्ट १९६०
क) २६ जानेवारी १९९०
ड) यापैकी नाही

३) पंचायत राज व्यवस्था लागू करणारे महाराष्ट्र कितवे राज्य आहे?
अ) ७ वे
ब) ५ वे
क) २५ वे
ड) ९ वे

४) पंचायत राज व्यवस्थेला (ग्रामीण) घटनात्मक दर्जा कोणत्या घटना दुरुस्तीने प्राप्त झाला?
अ) ७३ वी घटनादुरुस्ती
ब) ७२ वी घटनादुरूस्ती
क) ४२ वी घटनादुरूस्ती
ड) यापैकी नाही

५) शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा?
अ) ७२ वी घटनादुरुस्ती
ब) ७४ वी घटनादुरूस्ती
क) ४२ वी घटनादुरूस्ती
ड) यापैकी नाही

---

**उत्तरसूची :** १) अ २) अ ३) ड ४) अ ५) ब

६) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कोणत्या घटना दुरुस्तीने महिलांना आरक्षण लागू झाले?

अ) ७३ वी व ७४ घटनादुरुस्ती

ब) ७१ वी व ७३ वी घटनादुरुस्ती

क) ४० वी ४४ वी घटनादुरुस्ती

ड) यापैकी नाही

७) आज महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत किती टक्के आरक्षण आहे?

| | |
|---|---|
| अ) १००% | ब) ७५ % |
| क) ८० % | ड) ५०% |

८) ५० टक्के महिलांना आरक्षण कधी लागू झाले?

| | |
|---|---|
| अ) २०१२ | ब) २००० |
| क) २००८ | ड) १९८९ |

९) ७३ व ७४ वी घटनादुरुस्तीने महिलांना किती टक्के आरक्षण प्राप्त झाले?

| | |
|---|---|
| अ) १००% | ब) ७५ % |
| क) ८० % | ड) ३३% |

१०) महाराष्ट्रात कोणत्या समितीच्या शिफारशीने पंचायत राज व्यवस्था लागू झाली?

अ) वसंतराव नाईक समिती

ब) [illegible] समिती

क) बोंगिरवार पुनर्विलोकन समिती

ड) प्रा. पी.बी. पाटील समिती

११) महाराष्ट्र पंचायतराज संदर्भात कोणत्या अधिनियम अस्तित्वात आहे?

अ) महाराष्ट्र राज्य, जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१

ब) महाराष्ट्र राज्य, जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९५९

क) महाराष्ट्र राज्य, जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६२

ड) महाराष्ट्र राज्य, जिल्हा परिषद अधिनियम १९६०

१२) महाराष्ट्र मध्ये पंचायत राज व्यवस्थेची अंमलबजावणी (ग्रामीण भागात) केव्हा झाली?

| | |
|---|---|
| अ) २६ जानेवारी १९९० | ब) २५ एप्रिल १९९३ |
| क) २८ ऑगस्ट १९९५ | ड) २४ एप्रिल १९९३ |

उत्तरसूची : ६) अ ७) ड ८) अ ९) ड १०) अ ११) अ १२) ड



१३) ७४ वी घटनादुरुस्ती कधी लागू झाली ?

| | |
|---|---|
| अ) १ जून १९९३ | ब) १५ एप्रिल १९९३ |
| क) २८ ऑगस्ट १९९५ | ड) २४ एप्रिल १९९३ |

१४) ७३ व्या घटनादुरुस्तीने कोणत्या कलमात दुरुस्ती केली गेली?

| | |
|---|---|
| अ) कलम २२२ | ब) कलम २६८ |
| क) कलम २५६ | ड) कलम २४३ |

१५) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेतील पंचायतराज व्यवस्थेतील कनिष्ठ घटक कोणता?

| | |
|---|---|
| अ) पंचायत समिती | ब) जिल्हापरिषद |
| क) नगर परिषद | ड) ग्रामपंचायत |

१६) गाव पातळीवर कोणती व्यवस्था कार्यरत राहते?

| | |
|---|---|
| अ) ग्रामपंचायत | ब) पंचायत समिती |
| क) जिल्हापरिषद | ड) नगर परिषद |

१७) तालुका पातळीवर पंचायत राज व्यवस्थेत कोणती व्यवस्था कार्यरत राहते?

| | |
|---|---|
| अ) ग्रामपंचायत | ब) पंचायत समिती |
| क) जिल्हापरिषद | ड) नगर परिषद |

१८) जिल्हास्तरावर पंचायत राज व्यवस्थेत ग्रामीण भागात कोणती व्यवस्था कार्यरत राहते?

| | |
|---|---|
| अ) ग्रामपंचायत | ब) पंचायत समिती |
| क) जिल्हा परिषद | ड) नगर परिषद |

१९) ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे एकूण किती प्रकार आहेत?

| | |
|---|---|
| अ) सहा | ब) पाच |
| क) दहा | ड) तीन |

२०) ग्रामपंचायतमध्ये जास्तीत जास्त किती सदस्य असू शकतात?

| | |
|---|---|
| अ) १७ | ब) २० |
| क) २५ | ड) ५८ |

२१) ग्रामपंचायतमध्ये कमीत कमी किती सदस्य असावे?

| | |
|---|---|
| अ) ५ | ब) १० |
| क) ७ | ड) यापैकी नाही |

उत्तरसूची : १३) अ १४) ड १५) ड १६) अ १७) ब १८) क १९) अ २०) अ २१) क

२२) ग्रामपंचायत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचे कमीत कमी वय?
अ) २५ वर्षे ब) १८ वर्षे
क) ३० वर्षे ड) २१ वर्षे
२३) ग्रामपंचायत मतदाराची कमीत कमी वय किती?
अ) २५ वर्षे ब) १८ वर्षे
क) ३० वर्षे ड) २१ वर्षे
२४) ग्रामपंचायतीत महिलांसाठी राखीव जागा?
अ) १००% ब) ७५ %
क) ८५ % ड) ५०%
२५) ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावासाठी कोणती व्यवस्था?
अ) ग्रामपंचायत ब) पंचायत समिती
क) जिल्हापरिषद ड) गट ग्रामपंचायत
२६) ग्रामपंचायत स्थापनेसाठी कमीत कमी किती लोकसंख्या असावी?
अ) ५०० ब) २५०
क) २५२ ड) २२५
२७) सरपंचाची निवड ३ जुलै २०१७ च्या निर्णयाने कोणाद्वारे होणार होती?
अ) लोकांद्वारे ब) जिल्हापरिषदेद्वारे
क) आयुक्तांद्वारे ड) यापैकी नाही
२८) जानेवारी २०२० च्या निर्णयाने सरपंचाची निवड कोणाद्वारे घेण्याचे ठरले?
अ) निवडून आलेल्या सदस्यांद्वारे
ब) जिल्हापरिषदेद्वारे
क) आयुक्ताद्वारे
ड) यापैकी नाही
२९) सरपंचाचा कार्यकाळ?
अ) ५ वर्षे ब) १८ वर्षे
क) ६ वर्षे ड) ८ वर्षे
३०) ग्रामसभा कोण बोलावतो?
अ) सरपंच ब) उपसरपंच
क) ग्रामसेवक ड) तहसिलदार

**उत्तरसूची :** २२) ड २३) ब २४) ड २५) ड २६) अ २७) अ २८) अ
२९) अ ३०) अ



३१) ग्रामसभेचा अध्यक्ष?
अ) सरपंच ब) उपसरपंच
क) ग्रामसेवक ड) तहसिलदार
३२) ग्रामसभेचा सभासद कोण असतो?
अ) गावातील मतदार
ब) निवडून आलेले प्रतिनिधी
क) सर्व लोक
ड) यापैकी नाही
३३) महाराष्ट्रात ग्रामसभेला शक्तिशाली कोणत्या कायद्याद्वारे बनवल्या गेले?
अ) महाराष्ट्र अधिनियम २०२०
ब) महाराष्ट्र अधिनियम २०००
क) महाराष्ट्र अधिनियम २०१८
ड) महाराष्ट्र अधिनियम २०१०
३४) ग्रामसभेला अधिकार देण्यासाठी कोणी आंदोलन केले?
अ) अण्णा हजारे ब) बाबूराव काळे
क) बाबा रामदेव ड) यापैकी नाही
३५) सध्या आर्थिक वर्षात किती ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे?
अ) सहा ग्रामसभा ब) चार ग्रामसभा
क) एक ग्रामसभा ड) एकही नाही
३६) आर्थिक वर्षात पहिली ग्रामसभा कधी घेतली पाहिजे?
अ) एप्रिल महिन्यात ब) मार्च महिन्यात
क) डिसेंबर महिन्यात ड) जानेवारी महिन्यात
३७) ग्रामसभेची गणसंख्या किती?
अ) मतदारांच्या १५% किंवा शंभर व्यक्तींच्या उपस्थिती
ब) मतदारसंख्या ५०%
क) मतदारसंख्या २५%
ड) यापैकी नाही
३८) एक ग्रामसभा कोठे घेणे आवश्यक आहे?
अ) शहरामध्ये ब) तालुक्यामध्ये
क) निमशहरामध्ये ड) दलित वस्तीमध्ये

**उत्तरसूची :** ३१) अ ३२) अ ३३) ब ३४) अ ३५) अ ३६) अ ३७) अ
३८) ड

३९) ६ पैकी १ ग्रामसभा कुणाकरीता घेतली पाहिजे?
अ) महिलांकरीता ब) पुरूषांकरीता
क) महिला व पुरूषांकरीता ड) यापैकी नाही

४०) शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शासन कारभार पाहणारा महानगरातील घटक कोणता?
अ) महानगरपालिका ब) जिल्हा परिषद
क) नगरपरिषद ड) पंचायत समिती

४१) ज्या शहरांचे पूर्णपणे शहरीकरण झालेले नाही त्या शहरांसाठी?
अ) नगरपंचायत व्यवस्था ब) जिल्हा परिषद
क) महानगर ड) पंचायत समिती

४२) कमीत कमी किती शहराच्या लोकसंख्येच्या शहरासाठी महानगरसाठी नगरपालिकेची स्थापना करण्यात येईल?
अ) ३ लाख ब) ५ लाख
क) ७ लाख ड) १० लाख

४३) महाराष्ट्रात किती महानगरपालिका आहेत?
अ) २६ ब) २५
क) ३६ ड) २७

४४) अ+ दर्जाची महानगरपालिका कोणती?
अ) मुंबई ब) पूणे
क) ठाणे ड) औरंगाबाद

४५) महाराष्ट्रात महानगरपालिकेचे दर्जानुसार किती वर्गांमध्ये विभाजन केले गेले?
अ) ५ वर्ग ब) ६ वर्ग
क) १० वर्ग ड) यापैकी नाही

४६) 'अ' वर्ग महानगरपालिका कोणत्या?
अ) पूणे आणि नागपूर ब) पूणे आणि ठाणे
क) अकोला आणि नाशिक ड) औरंगाबाद आणि नाशिक

४७) महानगरपालिकेच्या निवडणुकीकरिता उमेदवाराची कमीत कमी वयोमर्यादा?
अ) २६ ब) २५
क) ३६ ड) २१

**उत्तरसूची :** ३९) अ ४०) अ ४१) अ ४२) अ ४३) ड ४४) अ ४५) अ ४६) अ ४७) ड

४८) मतदाराची वयोमर्यादा?
अ) २६ ब) २१
क) ३६ ड) १८

४९) महानगरपालिकेत महिलांसाठी आरक्षण?
अ) १००% ब) ७५ %
क) ८५ % ड) ५०%

५०) महानगरपालिकेचे पदाधिकारी?
अ) महापौर व उपमहापौर ब) आयुक्त व सभापती
क) सदस्य व नागरीक ड) यापैकी नाही

५१) महानगरपालिका सदस्याचा (नगरसेवक) कार्यकाळ किती वर्ष आहे?
अ) ५ ब) २.५
क) ६ ड) १

५२) महापौर उपमहापौरांची निवड कोण करतात?
अ) निवडून आलेले सदस्य (नगरसेवक) ब) सर्व लोक
क) मतदार ड) यापैकी नाही

५३) महापौर-उपमहापौर यांचा कार्यकाळ किती?
अ) ५ वर्ष ब) २ वर्ष
क) ६ वर्ष ड) १ वर्ष

५४) आयुक्ताची नियुक्ती कोणाद्वारे होते
अ) राज्य शासन ब) महापौर
क) उपमहापौर ड) पंचायत समिती

५५) आयुक्ताचा कार्यकाळ किती वर्ष आहे?
अ) ५ ब) ३
क) ६ ड) १

५६) जिल्हा परिषद अध्यक्षाला कशाचा दर्जा प्राप्त होतो?
अ) उपमंत्री ब) मुख्यमंत्री
क) राज्यमंत्री ड) कॅबिनेट मंत्री

५७) जिल्हा परिषदेचा प्रमुख?
अ) मुख्य कार्यकारी ब) सदस्य
क) नगरसेवक ड) नगराध्यक्ष

**उत्तरसूची :** ४८) ड ४९) ड ५०) अ ५१) अ ५२) अ ५३) ब ५४) अ ५५) ब ५६) अ ५७) अ